

# महासागर अमरावती

गुरूवार, दि. 10 ऑक्टोंबर 2024

पान 3




# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अमरावतीच्या जीएमसी चे उद्घाटन

## वैद्यकीय महाविद्यालये आरोग्यसेवेची केंद्र ठरावीत - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी








**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.9 )–** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे आज राज्यात 7 हजार 645 कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला. नागपूर व शिर्डी विमानतळाच्या कामांचे भूमिपूजन, स्क्रील सेंटर, तसेच नवीन 10 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे (जीएमसी) उद्घाटन करण्यात आले. यात अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे उद्घाटन ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. यावेळी खासदार डॉ.अनिल बोंडे, आमदार प्रताप अडसड, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, अपर जिल्हाधिकारी सूरज वाघमारे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. किशोर इंगोले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर आदी उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, नव्याने निर्माण होणारे वैद्यकीय महाविद्यालये लाखो परिवारांचे सेवेचे केंद्र ठरणार आहे. या केवळ संस्था ठरणार नसून असंख्य परिवारांचे जीवन घडविण्याचा यज्ञ आहे. नव्या वैद्यकीय महाविद्यालयांमुळे वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या 900 जागा निर्माण होणार आहेत. त्यामुळे आता राज्यभरात सहा हजार वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागा उपलब्ध होतील. यामुळे दुर्गम भागात नव्या संधीची दालने उपलब्ध होतील. आयुष्मान कार्डच्या माध्यमातून लाखो परिवारांना मोफत उपचार, तर जनऔषधी केंद्रातून स्वस्तात औषधे मिळत आहे. कर कमी करून हृदयरोग आणि कॅन्सरवरील औषधोपचाराचा खर्च कमी करण्यात आला आहे.

या माध्यमातून गरीब कुटुंबांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात आली आहे. प्रत्येक नागरिकाला माफक दरात उच्च प्रतीची आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी शासन कटिबद्ध आहे. केंद्र व राज्य शासनाने वैद्यकीय महाविद्यालयांकडे विशेष लक्ष देऊन नागरिकांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, तसेच वैद्यकीय अधिकारी निर्माण व्हावेत यादृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. यामुळे राज्यात दहा नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यात येत आहे. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या इच्छुक पात्र विद्यार्थ्यांना नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निर्मितीमुळे मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच आता येथे प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून म्हणजेच मराठीतून वैद्यकीय शिक्षण घेता येणार आहे. यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

आता ग्रामीण भागातील विद्यार्थीही वैद्यकीय शिक्षणात अग्रक्रमी राहतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. क्षिप्रा मानकर यांनी सूत्रसंचालन केले..

# सीएम आजारी, उद्योग मंत्र्यांचाच दौरा?

## धारणीत आज 707 कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.9 )** - राज्याचे मुख्यमंत्री(सीएम) एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत उद्या दि.10 ला धारणी येथे 707 कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन व शिवसेनेचे कार्यकर्ता संमेलन होवू घातले आहे. मेळघाटचे विद्यमान आमदार राजकुमार पटेल या कार्यक्रमात रितसर शिवसेनेमध्ये आपला प्रवेश करणार आहे. जिल्हा, तालुका प्रशासनासह आमदारांकडूनही कार्यक्रमाची संपुर्ण तयारी करण्यात आली आहे. मात्र रात्री उशिरापर्यंत मुख्यमंत्र्यांचा दौरा जिल्हा प्रशासनाकडून प्राप्त झाला नव्हता. दुसरीकडे फक्त उद्योग मंत्री उदय सामंत यांचाच दौरा प्राप्त झाल्याने मुख्यमंत्री येतील की, नाही याची धाकधूक आयोजकांना लागली आहे.



गेल्या दोन दिवसांपासून एकनाथ शिंदे आजारी अजून त्यांचे सर्व दौरे व बैठका रद्द करण्यात आल्या आहे. मात्र दुसरीकडे कार्यक्रमाचे आयोजक आ.राजकुमार पटेल यांनी कोणत्याही परिस्थितीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या कार्यक्रमाला आल्याशिवाय राहणार नाही, असा दावा केला आहे. यातच रात्री उशिरापर्यंत जिल्हा प्रशासनाकडून मुख्यमंर्त्यांचा रितसर दौरा प्राप्त न झाल्याने मुख्यमंत्री येण्याची आशा धुसर होताना दिसत आहे. मात्र उद्योग मंत्री उद्य सामंत सकाळी 11 वाजता विमानाने बेलोरा विमानतळावर येतील व तेथून हेलीकॅप्टरने 11.15 मिनिटांनी धारणी येथील कुसुमकोट आयटीआय समोर तयार करण्यात आलेल्या हेलीपॅड वर पोहोचतील असे जिल्हा प्रशासनाकडून त्यांच्या दौऱ्याबाबत कळविले आहे.

# अजय वानखडे खून प्रकरणातील मुख्य आरोपीसह दोघांना अटक

## एक अल्पवयीन ताब्यात | गुन्हे शाखा युनिट एकची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 9 )** - बडनेरा येथील शेत आवारात खरकाडीपुरा येथील अजय वानखडे याचा खून झाला होता. या प्रकरणातील मुख्य आरोपीसह दोन तरुणांना गुन्हे शाखा युनिट एकच्या पोलिसांनी अटक केली आहे. ही कारवाई केली. आकाश वसंतराव चव्हाण व सलमान अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे. यासोबतच पोलिसांनी एका अल्पवयीन मुलाला चौकशीकरिता ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी पोलीस आरोपींची अधिक चौकशी करत आहेत.

सोमवारी कोतवाली हद्दीतील जयस्तंभ चौकात मोंटू उर्फ प्रेमराज अनिल गोले याच्यावर चाकूने हल्ला करून, त्याची हत्या करण्यात आली. त्यावेळी मोंटुसोबत अजय वानखडे नामक तरुण उपस्थित होता. या घटनेनंतर अजय वानखडेने कोतवाली पोलीस ठाणे गाठून घटनेची माहिती दिली व तक्रार नोंदविली. त्यानंतर बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत अज्ञात आरोपींनी अजय वानखडे यांचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपी आकाश चव्हाणसह सलमान नामक तरुणाला अटक केली आहे. तर अल्पवयीन मुलाची चौकशी सुरू आहे. या प्रकरणाशी संबंधित आरोपींची चौकशी सुरू आहे. या प्रकरणात आणखी आरोपी वाढण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. गुन्हे शाखा युनिट पथकाने आरोपीला बडनेरा पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

# तलवार, चाकू बाळगणाऱ्या तिघांना गुन्हेशाखे कडून अटक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 9 )** - गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 चे अधिकारी व अमलंदार यांनी कडबी बाजार पोलिस चौकीजवळ तिन जणांना अटक करून, त्यांच्या ताब्यातून दोन तलवारी आणि एक चायना चाकू जप्त केला. आरेष खान आरीफ खान (19, रा. पठानच्या चक्कीजवळ, हैदरपुरा, अमरावती), मुजाहीद खान मतीन खान (18, रा. रहेमत नगर, अमरावती) व शेख रेहान शेख नौशाद (18, रा. सरकारी दवाखान्याजवळ, रहेमत नगर, अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. गुन्हे शाखेचे पथक नागपूरी गेट हद्दीत आरोपींच्या शोधकामी पेट्रोलींग करत असताना, त्यांना कडबी बाजार पोलीस चौकीजवळील एका दुचाकीवर तीन जण संशयास्पदरित्या दिसून आले. पोलिसांनी आरोपी मुजाहीद खान मतीन खान याच्याजवळील एक पांढरे पोत्याची पाहणी केली असता त्यामध्ये दोन तलवारी दिसून आल्या, तर त्याच्या कंबरेला एक चायना चाकु दिसून आला. त्यामुळे पोलिसांनी दोन्ही तलवार, चाकू आणि त्यांच्याजवळील विना क्रमांकाची दुचाकी असा एकुण 1 लाख 4 हजार 500 रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी व जप्त शस्त्र नागपूरी गेट पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आले असून, याप्रकरणात आरोपीविरुध्द भारतीय हत्यार कायद्याप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त, नवीनचन्द्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरखनाथ जाधव, एपीआय मनीष वाकोडे, पीएसआय प्रकाश झोपाटे, पोलिस हवालदार सतीष देशमूख, फिरोज खॉन, अलीमउददीन खतीब, नाझीमउददीन सैयद, विकास गुडदे, सुरज चव्हाण, निखील गेडाम, अमोल मनोहर, रोशन माहुरे, किशांर खेंगरे यांनी केली आहे.







आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# प्रेमात अडसर ठरल्याने तरुणीची हत्या

## प्रियकरासह प्रेयसीला अटक

## त्रिकोणी प्रेम प्रकरणाचा असाही अंत

## एक्सप्रेस हायवे स्थित श्रीकृष्ण मंदिराजवळील घटना



मृतक



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती** - एका तरुणावर दोन विवाहित तरुणीचे प्रेम जडले. त्याचे प्रेम मिळविण्यासाठी दोघींचा वाद झाला आणि एकीने दुसरीचा चाकूने वार करून खुन केला. ही धक्कादायक घटना मंगळवारी शहरात एक्सप्रेस हायवेवरील श्रीकृष्ण मंदिराजवळ उघडकीस आली. याप्रकरणात राजापेठ पोलिसांनी बुधवारी मुख्य आरोपी प्रेयसीसह तिच्या प्रियकरालाही अटक केली. सिमा सुभाष मेश्राम (28, रा. खरपी, चांदुररेल्वे) व सुरज दिलीप देशमुख (34, रा. कुर्हा) अशी आरोपींची नावे आहेत. त्रिकोणी प्रेमप्रकरणाचा हा अंत अमरावतीकरांना आश्चर्याचा धक्का देणारा ठरला आहे.

पोलिस सुत्रानुसार, शुभांगी सुरेश काळे (26, रा. शिरपूर आर्वी, ह.मु. नवीन पूर्नवसन, आर्वी) हिचे सात वर्षांपासून सूरज देशमुखसोबत प्रेमप्रकरण सुरु होते. तसेच सुरजचे सिमा मेश्राम हिच्यासोबत सुध्दा प्रेमप्रकरण सुरु होते. या दोघी विवाहित असून, दोघीही नवर्यापासून विभक्त राहत होत्या. या दोघींनाही सूरज देशमुख याने अमरावतीत विविध भागात भाड्याने घर देखील करून दिले.

दोघीही विविध परिसरात धुणी- भांडी घासण्याची कामे करायची. सूरजचे दोन्ही महिलांसोबत असणारे हे संबंध दोघींनाही माहिती होते. मात्र, मागील काही दिवसांपासून या दोघींमध्ये सूरजच्या प्रेमसंबंधावरून खटके उडायला लागले. या तिघांमध्ये सुरू असणारा हा वाद संपुष्टात यावा, यासाठी मंगळवारी तिघांनीही भेटून तोडगा काढण्याचा ठरवले होते. दरम्यान मंगळवारी शुंभागी ही तिच्या राजेश्री राजेंद्र अवथनकर (25, रा. आर्वी) या मैत्रिणीसोबत होती. त्यावेळी सुरज हा तिला फोन करून भेटायला बोलवीत होता. त्यानंतर शुंभागी ही आपल्या मैत्रिणीसोबत सायंकाळी 5 वाजता बियाणी चौकात भेटायला गेली. तेथून सुरजने शुंभागीला आपल्या दुचाकीवर बसून एक्सप्रेस हायवेवरील श्रीकृष्ण मंदिराजवळ नेले. त्यावेळी तिच्या मागेमागे शुंभागीची मैत्रिण राजेश्री सुध्दा होती. हे तिघेही एक्सप्रेस हायवेवरील श्रीकृष्ण मंदिराजवळ पोहोचले असता, तेथे सिमा मेश्राम आधीच उपस्थित होती. त्यावेळी शुंभागी व सिमा यांच्यात सुरजचे प्रेम मिळविण्यासाठी ओढताण झाली. दरम्यान सिमा मेश्राम हिने शुंभागीवर चाकूने हल्ला केला. चाकू शुंभागीच्या खांद्यावर व मानेजवळ लागला. त्यामुळे रक्ताबंबाळ अवस्थेत खाली कोसळली. त्यानंतर सिमा मेश्रामने तेथून पळ काढला. त्यानंतर सुरज व राजेश्री यांनी रस्त्यावरील एका ट्रकच्या चालकाच्या मदतीने शुंभागीला तत्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात आणले. त्यावेळी डॉक्टरांनी शुंभागीला मृत घोषीत केले.

### राजेंश्रीच्या तक्रारीवरून राजापेठ ठाण्यात गुन्हा दाखल

एक्सप्रेस हायवेवर सायंकाळी ही घटना घडल्यानंतर शुभांगी काळे हिला जखमी अवस्थेत सुरज देशमुख, तिची मैत्रिण व काही नागरिकांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी आणले होते. तेथे डाक्टरांच्या तपासणीनंतर 7.40 वाजताच्या सुमारास शुंभागी काळेला मृत घोषीत करण्यात आले. या घटनेची माहिती राजापेठ पोलिसांनी मिळताच, त्यांनी तत्काळ रुग्णालय गाठले आणि पुढील चौकशी सुरु केली होती. पोलिसांनी तिच्या मैत्रिणीची चौकशी केल्यानंतर, रात्री उशिरापर्यंत पोलिस आरोपी महिलेचा शोध घेत होते. या घटनेची तक्रार मृतक शुंभागीची मैत्रिण राजेश्री अवथकर हिने राजापेठ पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी सिमा मेश्राम व सुरज देशमुखविरुध्द गुन्हा नोंदविला.

### प्रि-प्लॅनिंग मर्डर, मोबाईल जप्त, चाकु जप्त

शुंभागीला घेऊन सुरज हा नवीन महामार्गावरील श्रीकृष्ण मंदिराजवळ पोहोचताच, तेथे सिमा मेश्राम आधीच उपस्थित होती. दरम्यान तीने जवळ आणलेला भाजीपाला कापण्याच्या चाकूने शुंभागीवर हल्ला केला. त्यामुळे सिमा मेश्राम ही हल्ला करण्याच्या तयारीनेच आल्याचे दिसून आले. या घटनेनंतर राजापेठ पोलिसांनी रुग्णालय गाठले आणि घटनास्थळी जाऊन पाहणी केली. पोलिसांनी मृतक शुंभागीचा मोबाईल जप्त ताब्यात घेतला. तसेच घटनास्थळावरून या गुन्ह्यातील चाकु जप्त केला.

# गोपाल अरबट गोळीबारीत अद्याप गवसले नाही धागेदोरे

- सीपींनी व्यक्त केले गोळीबारीचा बनाव असल्याचा संशय
- पोलिसांची चौकशीच सुरु, लवकरच खुलासा होण्याचे संकेत

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. ९)** - शिंदे गट शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाल अरबट यांच्या वाहनावर अज्ञातांनी गोळीबार केल्याची घटना वलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. या घटनेच्या अनुषंगाने गोपाल अरबट यांनी वलगाव पोलीस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली की, ते अमरावतीहून दर्यापूरच्या दिशेने त्यांच्या इनोव्हा कारमधून एकटेच जात होते. एका स्कॉर्पिओ गाडीतील 3 ते 4 अज्ञातांनी त्यांच्या गाडीला ओव्हरटेक करून त्यांना दर्यापूर रोडवर अडविण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या गाडीवरही गोळीबार केला. या तक्रारीत त्यांनी अमरावतीत राहणाऱ्या त्यांच्याच पक्षातील काही पदाधिऱ्यांवरही खळबळजनक आरोप केले होते. परंतू आता याप्रकरणाला वेगळे वळण मिळत असल्याचे दिसून येत आहे. कारण दिलेली तक्रारीनुसार आणि तपासादरम्यान समोर आलेले तथ्य यामध्ये अनेक तफावत आणि विरोधाभास असल्याचे आढळून येत आहेत. याप्रकरणाविषयी पोलिस आयुक्तांनीही संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणाचा तपास वलगाव पोलिसांकडून अजुनही सुरु आहे. या घटनेतील प्रत्येक बारीकसारीक तथ्ये पोलिस तपासून पाहत आहे. परंतू अद्यापही या प्रकरणाचे चित्र स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे हे प्रकरण अद्यापही गुलदस्त्यातच आहे. परंतू लवकरच या प्रकरणातील तथ्ये पुढे येणार असल्याचे संकेत वलगाव पोलिसांनी दिले असून, लवकरच या घटनेचा खुलासा होण्याची शक्यता आहे.

> गोपाल अरबट यांच्या वाहनावरील गोळीबार प्रकरणाचा तपास अजुनही सुरु आहे. यातील तथ्ये पुढे आल्यानंतर चित्र स्पष्ट होईल. ज्यावेळी याप्रकरणाचे चित्र स्पष्ट होईल, 100 टक्के खात्री झाल्यानंतर माहिती देण्यात येईल.
>
> **वैभव पानसरे, पोलिस निरीक्षक, वलगाव.**

### घटना वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली नाही!

शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख गोपाळ अरबट यांच्या गाडीवर 31 सप्टेंबरच्या रात्री गोळीबार झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणात अद्याप कोणताही ठोस पुरावा मिळालेला नाही. तांत्रिक माहिती व चालकाकडे चौकशी केली असता ही घटना वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली नसल्याचे समोर आले. फॉरेन्सिक अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. यासंदर्भातील प्रत्येक पैलूचा पोलीस सखोल तपास करत आहेत, अशी माहिती सीपी रेड्डी यांनी दिली.

# अचलपूर उपजिल्हा रुग्णालयाच्या स्थानांतरणाला विरोध

## शिवसेनेसह विविध संघटनांचे निवेदन



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर( दि. ९ )**- येथील उपजिल्हा रुग्णालयाचे आस्थापना व अन्य विभागाचे परतवाड्यातील कुटीर रुग्णालयात स्थानांतरित करण्याची प्रक्रीया सुरु आहे. या प्रक्रीयेला येथील नागरिकांकडून तीव्र विरोध करण्यात येत आहे. हे स्थानांतरण रद्द करण्याच्या मागणीसाठी जिल्हा शल्य चिकित्सक आणि अधीक्षक यांना नुकतेच शिवसेनेसह पत्रकार व इतर संघटनाकडू निवेदन देण्यात आले.

कुटीर रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत रुग्णालयाच्या कार्यालयाचे स्थानांतरण होऊ नये, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. उपजिल्हा रुग्णालयाच्या कार्यालयात जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, विवाह प्रमाणपत्र आणि वय प्रमाणपत्र यासारखी महत्त्वाची कामे केली जातात. अशा परिस्थितीत कार्यालयाच्या स्थानांतरामुळे स्थानिक नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागेल. तसेच, रुग्णालयाचे सोनोग्राफी आणि होमिओपॅथी विभागही बंद आहेत, ज्यामुळे रुग्णांना अन्यत्र जाण्याची गरज पडत आहे. शिवसेना पदाधिकाऱ्यांनी मागणी केली आहे की, आयसीयू रुग्णांना अमरावतीला पाठविण्याऐवजी अचलपूरमध्येच उपचार केले जावेत. कार्यालयाचे स्थानांतरण करण्यात आले, तर सर्व समुदायांचे नागरिक, ज्यामध्ये हिंदू-मुस्लिमांसह विविध राजकीय पक्षांकडून तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. रुग्णालयातील सोनोग्राफी केंद्र बंद आहे आणि पिण्याच्या पाण्यासाठी उपलब्ध फिल्टर मशीनही खराब आहे, ज्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना अशुध्द खारट पाणी प्यावे लागत आहे. ज्यामूळे त्यांना मुत्रपिंडाचे आजार होण्याची भीती आहे. तसेच रुग्णालयात दंतचिकित्सक आणि होमिओपॅथिक डॉक्टरचीही कमी आहे, ज्यामुळे रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वीज गेल्यावरही रुग्णांना बऱ्याच त्रासातून जावे लागते. स्थानिक नागरिकांनी मागणी केली आहे की रुग्णालयात सर्व सुविधा लवकरात लवकर उपलब्ध कराव्यात. निवेदन देताना शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख नरेंद्र पडोळे, शहर अध्यक्ष गजानन फिस्के, साजिद काझी, आणि पत्रकार संघटनेतर्फे फिरोज खान, मोहम्मद अजहरुद्दीन, फजल अहमद खान, शोएब कादरीश, शकील शाह सहभागी झाले होते.

# झालेल्या हत्यांचे व्यक्तीगत कारण!

## नागरिकांनी भीती बाळगू नये

## पोलिस आयुक्तांची माहिती



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.९ )** - शहरात गेल्या तीन दिवसांत चार खुनाच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये दहशत निर्माण होत आहे. शहरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असल्याचे मत व्यक्त करून, याविषयी ठोस कारवाई करण्याची मागणी विविध संघटनांकडून होत आहे. परंतू शहरात भितीचे वातावरण नाही. गुंडगिरीचा हैदोस नाही. सर्व काही शांततेचे वातावरण आहे. ज्या घटना घडल्या आहेत, त्या व्यक्तीगत कारणावरून घडल्या आहेत. यामध्ये गुन्हेगार प्रवृत्तीचा हात नाही. त्यामुळे नागरिकांनी भिती बाळगू नये, पोलिस नागरिकांच्या सेवेत तत्पर आहे. असे पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी बुधवारी पत्रपरिषदेत सांगितले. या गुन्हेगारीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिस विभागाकडून प्रयत्न केले जात आहे. बहुतांश घटनांमध्ये चाकूचा वापर करण्यात आला असून, त्यामुळे आता गुन्हे शाखा आणि डीबी पथकाकडून चाकू बाळगणार्यांना पकडण्यासाठी मोहीम राबविण्यात येणार आहे. अशी माहिती पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी दिली.

या आठवड्यात तीन दिवसांत 4 खुनाच्या घटना घडल्या आहेत. यामध्ये बहुतांश अल्पवयीन आरोपींचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र या अल्पवयीन मुलांची पोलिसात पूर्वीची नोंद नाही. अशा घटना रोखण्यासाठी झोपडपट्टीसह अनेक वस्त्यांमध्ये चाकू ठेवणार्या किंवा विकणार्यावर नजर ठेवण्यात येणार आहे. त्यासाठी गुन्हे शाखा आणि डीबी पथकाकडून कोम्बिंग ऑपरेशन राबविले जाईल. शस्त्र कायद्यांतर्गत मोहीम राबवून चाकू जप्त करण्यात येणार आहेत. याशिवाय खंडणी मागणे किंवा कुणाला धमकावणे अशी कोणतीही घटना घडल्यास तत्काळ पोलिसांना कळवावे, असे आवाहन पोलीस आयुक्त रेड्डी यांनी केले. तसेच 4 ऑक्टोबर रोजी नागपुरीगेट पोलीस ठाण्यात झालेल्या दगडफेकीप्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत 33 आरोपींना अटक केली आहे. ज्यामध्ये 24 आरोपींना एमसीआर अंतर्गत तुरुंगात पाठवण्यात आले. हा व्हिडिओ व्हॉट्स?प ग्रुपवर व्हायरल करणार्याचा पोलिस शोध घेत आहेत. त्यामुळे ही घटना घडली आहे. व्हिडिओ व्हायरल करणार्या आरोपींची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. अशी माहिती सीपी रेड्डी यांनी दिली. त्याचप्रमाणे रस्ते अपघातात दररोज मृत्यू होत आहेत. हे टाळण्यासाठी वाहनचालकांनी हेल्मेटचा वापर स्वसंरक्षणासाठी करावा, असे आवाहनही पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी केले.

# दुचाकी चोरी करुन ठेवली घरात लपून

## शिरखेड पोलिसांनी केली दुचाकी जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. ९)** - दुचाकी चोरी करून ती घरी लपून ठेवणार्या एका आरोपीला शिरखेड पोलिसांनी बुधवारी अटक केली. शुभम चंद्रदीप इंगळे (रा. दुर्गवाडा ता. मोर्शी) असे आरोपीचे नाव असून, त्याच्या घरातून पोलिसांनी दुचाकी जप्त केली आहे.

शिरखेड पोलिस ठाण्यात 23 सप्टेंबर रोजी गंगाधारराव रूपरावजी कोरे (रा.डोमक ता. मोर्शी) यांनी तक्रार दिली की, 22 सप्टेंबर रोजी त्यांची एमएच 27 वाय 0726 या क्रमांकाची दुचाकीने नेरपींगळाई येथील देशमुख मंगलकार्यालयात लग्न कार्यासाठी गेले होते. त्यावेळी मंगल कार्यालयासमोरून त्यांची दुचाकी चोराने चोरून नेली. त्यांनी या घटनेची तक्रार शिरखेड पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला. सटर गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस निरीक्षक सचिन लुले यांच्या मार्गदर्शनात नेरपींगळाई बीटचे जमादार पोलिस हवालदार मनोज कळसकर यांनी सुरू केला. त्यांनी तांत्रीक दृष्टया तपास सुरू करून गोपनीय माहीती घेतली असता, चोरी गेलेली दुचाकी मोर्शीतील दुर्गवाडा येथील रहिवासी शुभम चंद्रदीप इंगळे याने घरी लपवुन ठेवल्याची माहिती मिळाली. यावरून शिरखेडच्या पोलीसांनी मोठ्या शिताफीने आरोपीच्या घरातुन गुन्ह्यातील ती दुचाकी जप्त केली, दरम्यान पोलिसांनी फरार झालेला आरोपी शुभम चंद्रदीप इंगळे यास अटक केली आहे. सदरची कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार सचिन लुले, पोलिस हवालदार मनोज कळसकर, संतोष लहाने व पंकज चौधरी यांनी केली आहे.



रामभरोसे दुर्गा उत्सव मंडळ, हिवरखेड



न्यू सुर्या दुर्गा उत्सव मंडळ, हिवरखेड



न्यू विर अभिमन्यु दुर्गा उत्सव मंडळ, हिवरखेड



प्रगती दुर्गा उत्सव मंडळ, हिवरखेड



जय किसान दुर्गा उत्सव मंडळ, हिवरखेड



आझाद दुर्गा उत्सव मंडळ, हिवरखेड